Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 3.656

# मेक इन इंडिया : कुशल विकास आणि रोजगार



**प्रा. नरेंद्र हरीभाऊ शेगोकार**

वाणिज्य विभाग प्रमुख,

श्री व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा

ई—मेल : shegokarnh1972@gmail.com

## Abstract

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनामध्ये २५ सप्टेंबर, २०१४ रोजी 'मेक इन इंडिया' या नवीन अभियानाची सुरुवात केली. या अभियानाच्या उद्घाटनासाठी ३० देशामधील ३००० प्रमुख कंपन्यांचे सी.ई.ओ., उपक्रमे, उद्योजक यांना आमंत्रित करण्यात आले होते. या उद्घाटनाला कायदामंत्री, वाणिज्य मंत्री याशिवाय देशामधील मोठ्या कार्पोरेट प्रमंडळांचे प्रमुख उपस्थित होते. इंडिया इंकचे प्रमुख सी.ई.ओ. एम्बस्टर्डस् आंतरराष्ट्रीय उद्योग नेते, मंत्री, सरकारी अधिकारी उपस्थित होते. टाटा उद्योग समुहाचे अध्यक्ष साइरस मिस्त्री, मारुती सुझुकी इंडियाचे एम.डी. व सी.ई.ओ. केनिची आयुकावा, रिलायन्स इंडस्ट्रिजचे अध्यक्ष व एम.डी. मुकेश अंबानी, विप्रोचे अध्यक्ष अजीम प्रेमजी, आदित्य बिरला ग्रुपचे अध्यक्ष एम.बिरला, आय.सी.आय. सी.आय. बँकेचे एम.डी. व सी.ई.ओ. चंदा कोचर, आय.टी.सी. चे अध्यक्ष वाय.सी. देवेश्वर, उपस्थित होते.

**Keywords :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मेक इन इंडिया, रोजगार, युवक, आर्थिक उत्पन्न

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

# Research Paper

## Introduction

मुंबई येथील एम.एम.आर.डी.ए. मैदानावरील बांद्रा—कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये १३ फेब्रुवारी, २०१६ रोजी 'मेक इन इंडिया सप्ताह' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी २५०० अंतरराष्ट्रीय, ८००० स्वदेशी, ६८ देशांचे सरकारी प्रतिनिधी मंडळ, ७२ देशांचे व्यावसायीक संघ, भारतातील १७ राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमाअंतर्गत डी.आय.पी.पी. सचिव अमिताभ कांत यांनी महाराष्ट्रामध्ये १५.२ लाख करोड रुपये गुंतवणूकीचे प्रस्ताव आल्याचे सांगितले.

मेक इन इंडियाचे चिन्ह आकर्षक वाघ असून जे अशोक चक्राशी प्रेरीत असून भारतातील प्रत्येक क्षेत्रामध्ये सफलता दाखविते. हे अभियान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सन १९१६ मध्ये जन्माला आलेल्या प्रसिध्द देशभक्त व राजनैतिक व्यक्तिमत्त्व पंडित दीन दयाल उपाध्य यांना समर्पित केले आहे.

मेक इन इंडिया हे भारत सरकारने सुरु केलेले एक महत्त्वपूर्ण अभियान आहे. या अभियानासंबंधिचे व्यवस्थित अध्ययन करण्यासाठी शोधपत्रकर्त्याने शोधपत्राचे पुढील उद्येश निश्‍चित केले आहेत.

### शोधपत्राचे उद्देश :

- मेक इन इंडियाच्या संदर्भात अध्ययन करणे
- मेक इन इंडियाच्या संदर्भात तज्ज्ञ व्यक्तींच्या मतांचे अध्ययन करणे
- कुशल विकास आणि रोजगार निर्मिती संदर्भात अध्ययन करणे.

### माहितीचे संकलन :

शोधपत्रासाठी संबंधित असलेली माहिती संकलीत करण्यासाठी शोधपत्रकर्त्याने द्वितीय सामुग्री संकलनाच्या मार्गाचा अवलंब केला आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण, वर्तमान पत्रातील बातम्या, मेक इन इंडियाशी संबंधित वेबसाईट, मेक इन इंडियावरील निबंध, आर्टीकल्स इत्यादींचा समावेश आहे.

### मेक इन इंडियाच्या संदर्भात अध्ययन :

मेक इन इंडियाचा अर्थ भारताला 'मॅन्युफॅक्चरींग हब' बनविण्यासाठी स्वदेशी तसेच विदेशी गुंतवणूकदारांसाठी अनुकुल वातावरण निर्माण करण्याची हमी देणे, उपलब्ध संधींचा आणि निर्माण होणा—या समस्यांमध्ये योग्य समन्वय साधण्याचा मार्ग म्हणजे 'मेक इन इंडिया' होय.

### मेक इन इंडियाचे उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे :

- विनिर्माण क्षेत्रामध्ये दरवर्षी १२ ते १४ प्रतिशत वाढ करणे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

- भारतातील सकल घरेलु उत्पादनामध्ये विनिर्माण क्षेत्राचा वाटा २०२२ पर्यंत वाढवून तो १६ ते २५ प्रतिशत करणे.
- विश्वसनीय व पारदर्शक कर प्रणाली निर्माण करणे.
- सहज परवाना मंजूरी प्रक्रिया, सुरक्षा, पर्यावरणीय मंजूरी यासारख्या प्रमुख प्रक्रिया सहज व सरळ उपलब्ध करुन देणे.
- पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे.
- श्रम कायद्यामध्ये गरजेनुसार बदल करुन देण्याची हमी देणे.
- विनिर्माण क्षेत्राअंतर्गत २०२२ पर्यंत १०० मिलीअन अतिरीक्त रोजगार निर्माण करणे.
- ग्रामिण तसेच शहरी भागातील गरीब लोकांचा समग्र विकास करण्यासाठी कुशल विकास योजना निर्माण करणे.
- मूल्य संवर्धन तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या ज्ञानामध्ये वाढ करणे.
- भारतामध्ये विशेषत्वेकरुन पर्यावरणाच्या संदर्भात संतुलन साधून स्थिर विकास सुनिश्चित करणे.
- देशी आणि स्वदेशी गुंतवणूकदारांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे.
- देशाच्या आर्थिक विकास दराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करणे.

मेक इन इंडिया योजनेअंतर्गत देशातील गुंतवणूकदारांसोबतच विदेशी गुंतवणूक दारांना भारतामध्ये गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करणे. हे अभियान सुरु करण्यामागील मुख्य उद्देश भारताबाहेर जाणा—या बहुतांश उद्योजकांना भारतामध्येच उद्योग स्थापन करण्यासाठी आवश्यक असणा—या अटी शितिल करुन जागतिक पातळीवरील सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे हा आहे. वर्तमानामध्ये देशाच्या सकल घरेलु उत्पादनामध्ये विनिर्माणाचे योगदान १५ प्रतिशत आहे. ते अन्य विकसनशिल देशांप्रमाणेच २५ प्रतिशत पर्यंत नेणे हा या योजनेमागील महत्त्वाचा उद्देश आहे. या अभियानाअंतर्गत सरकारला अशी आशा आहे की, आपल्या देशातील अधिकाधिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. ही योजना अधिक प्रभावशाली बनविण्यासाठी डिजीटल इंडिया ही पायाभूत योजना सुरु केली आहे. त्यामुळे गरीबी कमी होऊन देशाच्या आर्थिक विकासामध्ये वाढ होईल, अशी आशा आहे.

वाणिज्य मंत्री निर्मला सितारमन यांनी मेक इन इंडिया हे अभियान यशस्वी करण्यासाठी सरकार देशी गुंतवणूकदारांसोबतच विदेशी गुंतवणूकदारांना आकर्शित करण्यासाठी आवश्यक असणारी नियामक प्रक्रिया सहज आणि सोपी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे सांगितले. जगातील विभिन्न देशातील राजधानीपर्यंत पोहोचण्यासाठी देशाच्या राजधानी सोबतच राज्याच्या राजधानी आणि विदेशातील भारतीय दुतावासातील अधिकारी, गुंतवणूकदार यांच्यासोबत संवाद प्रस्तापीत

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

करण्याची गरज आहे, असे आपले मत प्रगट केले. मेक इन इंडिया या अभियानाचे डिझाईन वेईडेन केनेडी यांनी तयार केले आहे. २५ क्षेत्रांशी संबंधित माहिती पुस्तिका आणि वेब पोर्टल या योजनेअंतर्गत तयार करण्यात आली आहेत. या योजनेअंतर्गत ज्या २५ क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे त्याची यादी पुढील प्रमाणे आहे.

*Automobiles*
*Automobile Components*
*Aviation*
*Biotechnology*
*Chemicals*
*Construction*
*Defence Manufacturing*
*Electrical Machinery*
*Electronic systems*
*Food Processing*
*Information Technology and Business Process Management*
*Leather*
*Mining*
*Oil and Gas*
*Pharmaceuticals*
*Ports and Shipping*
*Railways*
*Renewable Energy*
*Roads and Highways*
*Space and astronomy*
*Textiles and Garments*
*Thermal Power*
*Tourism and Hospitality*
*Wellness*
*Media and Entertainment*

**मेक इन इंडियाच्या संदर्भात तज्ज्ञ व्यक्तींच्या मतांचे अध्ययन :**

भारताचे अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सिडनीमध्ये मेक इन इंडिया संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी ऑस्ट्रेलियामधील उद्योगांना भारतातील विकासाच्या यशोगाथेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांनी असे सांगितले की, भारत आज जागतिक पातळीवर लक्ष आकर्षित करण्याचे प्रमुख केंद्र बनला आहे. यासाठी भारत सरकारचे मेक इन इंडिया अभियानावर विशेष लक्ष आहे. संरक्षण मंत्री मनोहर पर्रीकर यांनी अमेरिका भारत संरक्षण संयोगावर हे अभियान प्रभाव टाकू शकते. संरक्षण क्षेत्रामध्ये भारत हा अमेरिकेचा एक महत्त्वपूर्ण भागिदार आहे, असे मत कार्टर यांनी व्यक्त केले. त्यांच्या मते या योजनेमुळे या दोन देशांच्या संयोगावर अनुकुल प्रभाव पडेल. रेल्वे मंत्री सुरेश प्रभु यांनी देशाच्या आर्थिक विकासाचे ८ प्रतिशत लक्ष साध्य करण्यासाठी मेक इन इंडिया आणि डिजीटल इंडिया या दोन योजना महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडतील, असे मत व्यक्त केले. मेक इन इंडिया योजनेअंतर्गत भारत सरकारने चीनमधील गुंतवणूकदारांना भारतामध्ये गुंतवणूकीसाठी अनुकुल वातावरण निर्माण करुन देण्याची हमी दिली आहे. त्यामुळे चिनमधील गुंतवणूकदारांनी भारताच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये भागिदाराची भूमिका बजावून दोन देशातील द्विपक्षीय व्यापार वाढीस चालना मिळेल, असा आशावाद व्यक्त केला आहे. जागतिक पातळीवरील महान क्रिकेट खेळाडू

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

सचिन तेंडुलकर यांनी असे मत व्यक्त केले की, 'या योजनेमुळे अमेरिकेमधील लोकांच्या हातात भारतामध्ये निर्माण झालेले मोबाईल हँडसेट पहावयास मिळतील.

**कुशल विकास आणि रोजगार निर्मिती संदर्भात अध्ययन :**

**भारत कुशल मिशन :**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मते, 'भारत कुशल मिशन याचा अर्थ गरिबांच्या विरुध्द सुरु केलेली योजना असून ही योजना केवळ पोट भरण्यासाठी खिशामध्ये पैसे भरणे हा नसून गरिब परिवारामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन देशामध्ये एक नवीन ऊर्जा निर्माण करणे हा आहे. मागील शतकामध्ये आय.आय.टी. च्या माध्यमातून भारताने जागतिक पातळीवर शैक्षणिक क्षेत्राच्या संदर्भात एक महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. कुशल भारत म्हणजे आपल्या देशात छोटे छोटे आय.आय. टी. निर्माण करणे हा आहे. भारतामधील युवकांसाठी नवनवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे ही आमची प्राथमिकता आहे. ज्या प्रमाणे चिन हा जगाची मॅन्युफॅक्चरींग फॅक्टरी आहे त्याचप्रमाणे भारत हा जागतिक पातळीवर मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची राजधानी झाली पाहिजे, अशी आशा व्यक्त केली. यासाठी पुढील योजना राबविल्या जाणार आहेत —

प्रधानमंत्री कुशल विकास योजना

राष्ट्रीय कुशल विकास निगम

कुशल विकास पुढाकार योजना

वी—स्किल्स

राजस्थान नॉलेज कॉर्पोरेशन या प्रमाणे इतर राज्यांमध्ये सुध्दा अशी कार्पोरेशन्स स्थापन करणे.

नॅशनल स्कील सर्टीफिकेशन आणि मनी रिवार्ड स्किम

इ—गव्हर्नन्स ट्रेनिंग आणि सर्टीफिकेशन महाराष्ट्र

ऑन लाईन प्री कोर्स वेब साईट

भारतामध्ये ६५ प्रतिशत लोकसंख्या ही ३५ वर्षापेक्षा कमी वय असणारांची आहे. त्यामुळे भारत सरकारने कुशल भारत अभियान सुरु करुन या अभियानाअंतर्गत देशासोबतच जागतिक पातळीवर आवश्यक असणारा कुशल मनुष्यबळ वर्ग उपलब्ध करुन देण्याची हमी दिली आहे. कुशल विकास आणि रोजगार संधी या दोघांमध्ये योग्य समन्वय साधण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मेक इन इंडिया होय. मेक इन इंडिया योजनेमुळे आपल्या देशात केली जाणारी गुंतवणूक आणि त्याद्वारे निर्माण होणा—या रोजगाराच्या संधी याबाबतचे विवेचन पुढील प्रमाणे केले आहे.

- स्पाईस ग्रुपने उत्तर प्रदेशमध्ये जानेवारी, २०१५ मध्ये ५ अब्ज गुंतवणूक करुन मोबाईल फोन बनविणारे केंद्र सुरु करण्याचे जाहिर केले. तसा करार स्पाईस ग्रुप आणि उत्तरप्रदेश सरकारदरम्यान झाला.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

- ह्युन चिल हॉग हे साऊथ आशियामधील सॅमसंग कंपनीचे अध्यक्ष आणि सी.ई.ओ. एम.एस. एम.ई. खात्याचे केंद्रीय मंत्री कमलराज मिश्रा यांच्या एम.एस.एम.ई. सॅमसंग टेक्निकल स्कूल दोघांच्याही प्रयत्नाने स्थापन करण्याबाबत चर्चा झाली. या स्कूलअंतर्गत फेब्रुवारीमध्ये सॅमसंग कंपनीने झेड—१ हा प्लान नोएडामध्ये सुरु करण्याचे जाहिर केले.
- फेब्रुवारी, २०१५ मध्ये हिताची कंपनीने भारतातील आपल्या कंपनीमधील कामगारांची संख्या दहा हजारांवरुन तेरा हजारांपर्यंत वाढविण्यात येईल, असे घोषित केले. ही कंपनी चेन्नईमध्ये २०१६ मध्ये ऑटो कंपोनन्ट प्लान्ट सुरु करणार आहे.
- फेब्रुवारी, २०१५ हवाई ने नवीन संशोधन विकास प्रकल्प बंगलुरु मध्ये सुरु केला जाणार आहे, असे सांगितले. या प्रकल्पामध्ये १७० अब्ज डॉलरची गुंतवणूक केली जाणार आहे. हवाई हा देश चेन्नई मध्ये टेलिकॉम हार्डवेर मॅन्युफॅक्चरींग प्लान्ट सुरु करण्याच्या तयारीत आहे.
- ८ ऑगस्ट, २०१५ रोजी फॉक्सकॉम कंपनीने संशोधन आणि विकासासाठी आणि हायटेक सेमी कंडक्टर मॅन्युफॅक्चरींग महाराष्ट्रात सुरु करण्यासाठी ५ अब्ज डॉलरची गुंतवणूक ५ वर्षासाठी करण्याची घोषणा केली आहे. जनरल मोटर्सने १ अब्ज डॉलरची गुंतवणूक ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरींग साठी महाराष्ट्रात केली जाणार असल्याचे जाहिर केले.
- १८ ऑगस्ट, २०१५ रोजी लिनोओ ने चेन्नई जवळील श्रीपेरुम्बदुर येथे मोटोरोला स्मार्टफोन प्लान्ट सुरु करण्याचे जाहिर केले.
- नोव्हेंबर, २०१५ मध्ये ब्लॅकबेरी, एच.टी.ई.सी. आणि मोटोरोला सारख्या कंपन्यांना उपकरणे पुरविणा—या तैवानच्या विस्ट्रोन कॉर्प कंपनीने नोएडा या ठिकाणी उपकरणे बनविणारी कंपनी सुरु करण्याची घोषणा केली.
- ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी रेल्वे मंत्रालयाने अलस्टोम आणि जी.ई. ट्रान्सपोर्ट सोबत ४०० अब्ज रुपयांचा करार केला. या करारानुसार लोकोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरींग फॅक्टरीज मधेपुरा आणि मरहुरा या ठिकाणी बिहार मध्ये सुरु करण्यात येणार आहे.
- १० भारतीय हार्डवेअर कंपन्यांना पुरेपुर उत्पादन क्षमता गाठण्यासाठी क्वालकॉम कंपनी मदत करणार असे डिसेंबर, २०१५ मध्ये जाहिर केले. या अंतर्गत बेंगलुरु येथे इन्होव्हेशन लॅब सुरु करण्यात येणार आहे. याच महिन्यात मायक्रोमॅक्स कंपनीने ३ नवीन मॅन्युफॅक्चरींग युनिट राजस्थान, तेलंगाना आणि आंध्रप्रदेशमध्ये सुरु करण्याचे जाहिर केले. या अंतर्गत कंपनी तीन अब्ज रुपयांची गुंतवणूक करणार असून तीन हजार ते साडेतीन हजार लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहे.
- व्हीओ मोबाईल इंडिया ही कंपनी डिसेंबर, २०१५ अखेर पर्यंत स्मार्ट फोन प्लान्टची सुरुवात करुन त्याद्वारे २२०० लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातील.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

- मेक इन इंडिया या अभियानाद्वारे प्रेरीत झालेली डाटा वील्ड ही कंपनी स्वस्त हॅन्डसेट व टॅबलेट तयार करण्यासाठी १०० कोटी रुपयांची गुंतवणूक करुन तिसरा प्लान्ट सुरु करण्यासाठी पश्चिम बंगालसह अन्य पूर्व राज्यांसोबत बोलणी सुरु असल्याचे कंपनीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले आहे.
- भारतामध्ये आपली स्थिती मजबूत करण्याच्या हेतूने स्मार्ट फोन कंपनी जियोनी पुढील वर्षाच्या अखेरपर्यंत आपल्या सेल्समनची संख्या वाढवून ती १५००० पर्यंत करणार आहे. संपूर्ण देशभर २०० अतिरीक्त ब्रान्ड स्टोअर्स सुरु करण्याची घोषणा सुध्दा केली आहे.
- रिलायन्स इंडस्ट्रीजचे प्रमुख आणि एम.डी. श्री. मुकेश अंबानी यांनी या अभियानाअंतर्गत आमचा समुह एक लाख ऐंशी हजार करोड रुपयांची गुंतवणूक करणार असल्याची घोषणा केली. याद्वारे भारतामध्ये येत्या १२ ते १५ महिन्यात एक लाख पंचवीस हजार नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जातील, असे सांगितले.

**सारांश :**

मेक इन इंडिया हे अभियान यशस्वी करण्यासाठी पायाभूत सोयी सुविधा तसेच आईवे ची सुविधा, जी.एस्.टी. बील श्रम कायद्यामध्ये सुधारणा, देशी—विदेशी गुंतवणूकदारांना आपल्या देशात गुंवतणूक करण्यासाठी प्रोत्साहित करुन त्यांना त्यांच्या गुंतवणूकीची हमी देणे. औद्योगिक परवाना पध्दती सोपी व सरळ करणे, कुशल विकास योजनेअंतर्गत मूल्यवान व प्रतिष्ठा प्राप्त करुन देणाऱ्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे. सरकार, उद्योगपती, शिक्षण तज्ज्ञ, युवक यांच्या विचारामध्ये एकरुपता निर्माण करुन देणे, अशा प्रकारच्या सोयी—सुविधा उपलब्ध करुन दिल्यास भारतातील गरीबांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होऊन देशाच्या आर्थिक विकासात वाढ होण्यास मदत होईल, यात शंका नाही.

## REFERENCES

www.makeinindia.com

https://en.wikipedia.org/wiki/make_in_india

https://www.hindikiduniya.com/essay/india/make-in-india

https://khabar.ndtv.com/news/business

https://agoodplace4all.com

https://khabar.ibnlive.com.makeinindia-451997.html

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.